RCS No. 82/2019

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.८२/२०१९ मधील निशाणी ३७ खालील आदेश</u>**

**(हरीश्चंद्र कांबळे वगैरे वि. राजेश्री ढेपे वगैरे)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूमाकरिता व निरंतरच्या ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील वादी क्र. १ हरिश्चंद्र मारुती कांबळे हे दि. १४.१०.२०२४ रोजी मौजे मेढे, ता. तळा, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्यूमुळे दाव्यास असलेले कारण नष्ट झालेले नाही. त्यामुळे सदरकामी वादी क्र. १ यांचे वारस दाव्याकामी दाखल करणे आवश्यक आहे अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज प्रतिवादीस मान्य व कबुल नाही. सदरचे अर्जावर वादी व वादी यांचे वकील यांनी सही केलेली नाही. सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी तर्फे करणेत आली आहे.

४. निशाणी ३७ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्टयर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी क्र. १ मयत असल्याचे त्यांच्या वारसांनी शपथेवर सांगितले आहे. तसेच प्रतिवादी यांनी वादी क्र. १ मयत झाल्याचे व अर्जदार हे मयत वादीचे वारस असल्याचे नाकारलेले नाही. अर्जदाराचे कथनाप्रमाणे वादी क्र. १ हरिश्चंद्र मारुती कांबळे हे दि. १४.१०.२०२४ रोजी

मयत झाल्याचे समजते. अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार झालेले आहेत. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीने दाखल केलेली निशाणी ३३, ३५ कडील वादी यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब व उपशम रद्द होणेबाबतचा अर्ज मंजूर करणेत आलेला आहे. त्यामुळे न्याय हिताचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) निशाणी ३७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

(३) सदर दुरुस्तीची नोंद संगणक प्रणालीमध्ये तसेच दाव्याचे नोंद रजिस्टरमध्ये घेणेत यावी.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.06.09 17:39:22 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–०९.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.